The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# ज्ञानेश्वरीतील नीतीमूल्ये

**रामदास नारायण दराडे**

पीएच. डी संशोधक विद्यार्थी, मराठी संशोधन केंद्र, पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर,

**प्रास्ताविक :**

सत्पुरुषांची वाणी व साहित्य हे समाजाला जागृत करणारे असते. सत्य, असत्याचा विवेक हा त्यांच्या साहित्याचा मुख्य घटक असून त्यांची वाणी तथा साहित्य जगताच्या शांतीसाठी, लोककल्याणार्थ, समाजजीवनात वास्तवाचे दर्शन घडवून आणण्यासाठी प्रवृत्त होत असते. याला संतसाहित्य अपवाद नाही. भारतीय संतसाहित्य वा सत्पुरुषांच्या साहित्यावर जर आपण दृष्टिक्षेप टाकला तर आपणास हेच दिसून येईल की त्यांच्या साहित्याचा मुख्य हेतू हा वर उल्लेख केल्याप्रमाणेच आहे.

**प्रबोधाय विवेकाय हिताय प्रशमाय च |**
**सम्यक तत्त्वोपदेशाय सतां सूक्तिः प्रवर्तते ||८||**
**ज्ञानार्णव, पृ. क्र. ६**

ज्ञानार्णवातील या श्लोकात म्हटले आहे की, समाजाला बोध करून देण्यासाठी, विवेक जागृत ठेवण्यासाठी, हितासाठी, उत्तम शांतता प्रस्थापनेसाठी, यथार्थ तत्त्वोपदेशासाठी सत्पुरुषांचे सूक्त असतात. संतसाहित्याकडे पाहत असताना हा ज्ञानार्णवातील विचार त्यात ओतप्रोत भरलेला आहे हे आपणास प्रकर्षाने जाणवते. म्हणूनच समाजात सत्पुरुषांच्या वाङमयाची ईश्वराप्रमाणेच पूजा होताना दिसते. त्यांना धर्मग्रंथ, पंथग्रंथ म्हणून देखील मान्यता मिळते. त्यांच्या साहित्याची पुस्तके पूजेची ग्रंथ झालेली आपण पाहतो. ती पूजनीय आहेतच त्याबरोबर त्या ग्रंथात मांडलेले विचार आपल्या आचरणात असणे हे जास्त महत्त्वाचे आहे. ते लोकांसाठी लिहिले गेले असल्यामुळे लोकांकडून त्यांची पूजा होते. मराठी लोकजीवनात लोकप्रियतेला तथा महाराष्ट्रीय जनतेत पूज्यतेला पावलेली ज्ञानेश्वरी देखील त्यापैकी एक होय. तिचे नानाविध पद्धतीने उपयोजन होताना दिसते. अनेक पद्धतींनी तिचा अभ्यास होताना दिसतो. ज्ञानेश्वरी विषयी अभ्यासकांनी वेगवेगळे निसहर्ष मांडलेले आहेत. तिला साहित्याचा ग्रंथ, तत्त्वज्ञानाचा ग्रंथ, नवरससागर, कर्मयोग प्रधान, भक्तियोग प्रधान, योगामार्ग, संन्यासमार्ग प्रधान, सामाजिक चळवळीचा ग्रंथ अश्या अनेक दृष्टिकोनातून तिच्याकडे पहिलं जातं. भक्त, भाविक, रसिक, मुमुक्षू, समाजवादी, विद्वान, वैज्ञानिक, योगी ई. बहुविध पद्धतीचे ज्ञाते ज्यावेळी या ग्रंथाकडे येतात तेव्हा त्यांना असे वाटते की हा ग्रंथ आपला आहे. आपल्या विचारसरणीला

अथवा आपल्या मताला ज्ञानेश्वरी आधार देणारी आहे. सर्वांची ही रस्सीखेच पहिली म्हणजे ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीविषयी जे मत मांडलेले आहे त्याची यथार्थता पटते. ते म्हणतात,

**एका रसाळपणाचिया लोभा | कीं श्रवणींचि होती जिभा**
**बोले इंद्रियां लागे कळंभा | एकमेका ||१६||**
**सहजें शब्द तरी विषो श्रवणाचा | रसना म्हणे रस हा आमुचा**
**घ्राणासि भाव जाय परिमळाचा | हा तोचि होईल ||१७||**
**नवल बोलती रेखेची वहाणी | देखता डोळा पुरो लागे धणी**
**ते म्हणती उघडली खाणी | रुपाची हे ||१८||**
**जेथ संपूर्ण पद उभारे | तेथ मनची धांवे बाहिरें**
**बोल भुजांहीं आविष्करे | आलिंगावया ||१९||**
**ऐसीं इंद्रियें आपुलालिल्या भावीं | झोंबती परी तो सरिसेपणेंचि बुझावी**
**जैसा एकला जग चेववी | सहस्त्रकर ||२०||ज्ञानेश्वरी, अ-६**

संत ज्ञानेश्वरांनी या वोव्यांतून म्हटले आहे की, प्रत्येक इंद्रियाला वाटते की हा आपलाच विषय आहे आणि असे समजून ते त्या शब्दांवर तुटून पडतात. त्यांचे एकमेकांमध्ये भांडणं देखील होतात असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. अनंत विषयांना आकळण्याची प्रतिभा ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी आहे. प्रत्येक अभ्यासकाला तिच्यात स्वतःचा विषय मिळतो. हजार हात असलेला सूर्य जसा एकटा या जगाला जागवतो, जगवतो अगदी त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरीमध्ये देखील मूलतःच प्रत्येकाला "**बुझाविण्याचे**" सामर्थ्य आहे. ज्ञानेश्वरा नंतर वारकरीपंथातील सकळसंतमांदियाळीने ज्ञानेश्वरी हा ज्ञानसागर आहे असे म्हटले आहे. किंबहुना ज्ञानेश्वरीमुळेच आम्ही संतत्वास प्राप्त झालो असे देखील म्हणतात. अनेक अभ्यासकांनी ज्ञानेश्वरीचे अनेक अंगांनी अध्ययन केले आहे व आजपावेतो करत आहेत. यावरून या ग्रंथाची उपयुक्तता आणि महत्व लक्षात येण्यासारखे आहे. संत ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरीमागील मुळहेतू हा समाजाला शिकवण देण्याचा आहे. साडेसात शतकांपूर्वी दिलेली शिकवण आजही समाजोपयोगी आहे हे चमत्कृत करणारे ठरते. त्यांनी दिलेली शिकवण ही त्रिकालाबाधित असून समाजजीवनासाठी आजही तिची उपयुक्तता किती महत्वपूर्ण आहे हे आपल्याला या शोधनिबंधातून पहावयाचे आहे.

**१] गुरुजनांप्रति असणारा पूज्यभाव :**

संत ज्ञानेश्वरांनी आपल्या श्रीगुरूंना सर्वश्रेष्ठ मानले आहे. ज्ञानेश्वरीमध्ये जेव्हा जेव्हा गुरूंचे वर्णन करण्याचा प्रसंग येतो तेव्हा संत ज्ञानेश्वरांची वाणी त्यांना आवरत नाही. श्रीगुरूंचे वा संतांचे वर्णन हा ज्ञानेश्वरांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. ते जेव्हा वर्णन करत असताना थांबतच नाहीत तेव्हा त्यांचे गुरु स्वतः त्यांना सांगतात की हे वर्णन, स्तुति करणे थांबव आणि मुळविषयाकडे लक्ष दे.

**"तंव संतोषोनि श्रीगुरूराजें | म्हणितलें विनतिव्याजें**
**मांडिलें देखोनि दुजें | स्तवनमिषें ||२५||**
**हें असो आतां वांजटा | तो ज्ञापनार्थ करुनि गोमटा**
**ग्रंथार्थ दावीं उत्कंठा | भंगों नेदीं ||२६||"[१]**

असे श्रीगुरू निवृत्तीनाथांना ज्ञानेश्वरांस सांगावे लागते. ज्ञानेश्वरांनी श्रीगुरूंना भगवंत मानले आहे. जीवनात जे काही प्राप्त झाले ते सर्व श्रीगुरूंमुळेच असे त्यांना वाटते. ज्ञानेश्वरीतील अनेक प्रसंगी संत ज्ञानेश्वरांच्या अंत:करणातील गुरुभक्ति प्रगट होते. वर्तमानकाळात सुद्धा जे आपल्या जीवनास योग्य आकार देणारे आहेत त्यांच्याप्रति आपल्या अंत:करणात आदरभाव असणे अत्यावश्यक आहे.

**२] दोषांचा अस्वीकार**

मनुष्याच्या ठिकाणी असणारे दोषच मानवी हितास बाधक आहेत. मानुष्याचा स्वभाव हा मूलतः दोषयुक्त असतो, त्यामध्ये अनेक दोषांचा अंतर्भाव होतो. आपल्या ठिकाणी असणारे दोष हे आपल्या अहितास कारणीभूत ठरतातच, त्याचबरोबर ते समाजासाठीही घातक असतात. छोट्या छोट्या दोषांचे दुष्परिणाम किती मोठया प्रमात होतात ते आपण पहातोच. दोष हे अग्निप्रमाणे आहेत त्यांचा सहज जरी अंगिकार झाला तरी ते पूर्ण विश्वाला नष्ट करु शकतात. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात अग्नी हा जाणीवपूर्वक लावला किंवा खेळता खेळता लागला तरी तो चांगलं वाईट सगळं जाळून टाकतो.

**देखें खेळतां अग्नि लागला | मग तो न सांवरे जैसा उधवला**
**तैसा इंद्रियां लळा दिधला | भला नोहे ||२०५||[२]**

अगदी त्याचप्रमाणे एखादा दुर्गुण समाजाची वा निसर्गाची दयनीय अवस्था करून टाकतो. ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायात आसुरी संपत्तीचा उल्लेख आला आहे ही आसुरी संपत्ती म्हणजेच मानवी स्वभावातील दुर्गुणरूपी असुर आहेत.

ज्ञानेश्वरांनी बाह्य शुद्धीपेक्षा अंतर्शुद्धीला जास्त महत्व दिलेले आहे. अंत:करणात दोषं असतील तर बाहेरून कितीही चांगले ग्रहण करा त्याचे विषच होते. पोषक असणारे दूध जर सापाने प्राशन केले तर त्याचे विष तयार होते.

**दुधाचें काळकूट | होय व्याळीं ||२४०||[३]**

त्याप्रमाणे अंतर्गत दोषांमुळे ज्या हितकर गोष्टी आहेत त्या सुद्धा अहितासाठी कारणीभूत ठरतात. ज्ञानेश्वरांनी समाजातील सगळ्याच दुर्गुणांना लक्षात घेऊन ते दुर्गुणच मूर्तिमंत होऊन आपल्यात कशा पद्धतीने वावरतात हे आपणास लक्षात आणून दिले आहे. याचा उल्लेख कुलकर्णी श्री. मा. यांनी 'ज्ञानेश्वरीतील शिकवण' या आपल्या ग्रंथात उत्तमरित्या केला आहे. **"चोर, लुटारू, दरोडेखोर, गुंड हे जे**

**समाजद्रोही व समाजघातक लोक आहेत ते ज्या ज्या निर्दयपणाच्या क्रिया करतात त्या त्या क्रियांचचं वर्णन येथे ज्ञानेश्वरांनी केलं आहे हे कळायला वेळ लागणार नाही. काम-क्रोध हे व्यक्तिगत दुर्गुण तर खरेच. त्यांच्यामुळे ज्ञान प्राप्तीला अडथळा होतो, ईश्वरोपासणनेत व्यत्यय उत्पन्न होतो हेंहि खरें. परंतु या परमार्थ दृष्टीने केलेल्या वर्णनाबरोबरच सामाजिक दृष्टीनेहि जें त्यांचें वर्णन केले आहे ते विशेषत्वाने लक्षात घ्यावयास पाहिजे. म्हणजे जे दुर्गुण व्यक्तीच्या अंतिम कल्याणाला बाधक आहेत ते समजव्यवस्थेलाहि विघातक आहेत असे ज्ञानेश्वरांनी सूचित केले आहे".**[४] श्री. मा. कुलकर्णी यानी मांडलेले हे मत माणसांना दोषांमुळे येणारे विकृत स्वरूप दाखवणारे आहे. मनुष्यामध्ये असणारे दोष वाईट आहेत मनुष्य वाईट नाही. अंत:करणातील दोष नाहीसे झाल्यानंतर प्रत्येकजण श्रेष्ठ, पवित्र आहे. अंत:करणात असणारा दोषाचा वाकडेपणा घालवा, किंबहुना तो जावा हीच प्रार्थना पसायदानामध्ये ज्ञानेश्वर विश्वात्मकदेवाकडे करतात. **जे खळांची व्यंकटी सांडो | तया सत्कर्मी रती वाढो**[५] पसायदानातील काही मागण्यांपैकी ही पहिलीच मागणी आहे. या मागणीमध्ये विश्वकल्याण दडलेले आहे. देवाकडे प्रार्थना करण्याचे कारण असे की, सामान्य लोक या दोषांमुळे बरबाद होतात यात नवल नाही तर मोठमोठे मनुष्य देखील यांच्यामुळे लयाला गेलेले आपण पाहतो. हे दोष किती विचित्र आहेत, माणसास कसे अधोगतीला घेऊन जातात, हे बोबडे पु. वि. यांनी 'जीवन पथ दीपिका अर्थात ज्ञानेश्वरी' या आपल्या ग्रंथात अत्यंत खुबीने मांडले आहे. **"हे पाण्यावाचून बुडवितात, अग्निवाचून जाळतात आणि प्राण्यांना गुपचुप घेरतात. हे शस्त्रावाचून ठार करतात, दोरावाचून बांधतात आणि ज्ञान्यांना तर प्रतिज्ञापूर्वक जिंकतात. हे चिखलावाचून गाडतात व जाळ्यावाचून अडकवितात. हे अंतरंगी राहत असल्यामुळे सर्वथा अजिंक्य आहेत".**[६] हे दोष आपला घात करत असताना आपणास कसे समजू देत नाहीत ते बोबडे यांनी मानडले आहे. हे अगदी पटण्यासारखे आहे. आपण हे समजून घेऊन, या दोषांना दूर करण्याची कला अवगत केली पाहिजे आणि त्या कलेच्या सहयाने आपले जीवन सुखी जगण्याचा प्रयत्न करावा. जीवाने या षड्रिपूंवर मात केल्यास तो ब्रह्म आहे. हे भगवान श्रीकृष्ण सांगतात.

**अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् |**
**विमुच्य निर्मम: शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते |**[७]

**३] कर्म प्राधान्य :**

गीतेने कर्माला प्राधान्य दिले आहे. स्वकर्मापासून विन्मुख झालेल्या अर्जुनाला कर्मप्रवृत्त करण्यासाठीच गीता सांगितली गेली आहे. गीतेने असे म्हटले की 'कर्म करावे परंतु फळाची अपेक्षा ठेऊ नये'. कर्म करणे आपल्या हातात आहे, परंतु त्याचे फळ आपल्या हातात नाही. ते आपल्या

अपेक्षेप्रमाणे मिळेल अथवा मिळणार नाही हे काही सांगता येत नाही. मात्र कर्म करण्याचा उपदेश गीतेने केला आहे.

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन |**

**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गो$स्त्वकर्मणि ||४७||**[८]

गीतेवर अनेक टीकाकारांनी टीका केलेल्या आहेत, परंतु फक्त श्लोकाचा अर्थ सांगितला आहे, मात्र संत ज्ञानेश्वर असे टीकाकार आहेत की जे गीतेच्याही पुढे जाऊन अर्थ सांगतात. गीतेचा शब्दार्थ तर सांगतातच त्याचबरोबर शब्दांच्या आत असणार भाव उकलून दाखवतात. शब्दांमधून न उमगणारा अर्थ संत ज्ञानेश्वर कसा प्रगट करतात ते श्री. मा. कुलकर्णी यांनी दाखवून दिलेले आहे. **"गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या श्लोकातील 'माते सङ्गोस्त्वकर्मणि' या चरणाचा अर्थ इतर टीकाकरांनी 'कर्मे न करण्याचा आग्रह धरू नको' आशा प्रकारचा केलेला असतांना ज्ञानेश्वरांनी 'कुकर्मी संगती न व्हावी' असा केलेला आहे. 'हे सत्क्रियाचि आचरावि | हेतूविण' अशी पुस्तीहि ज्ञानेश्वर जोडतात".**[९] श्री. मा. कुलकर्णी यांनी मांडलेले हे मत संत ज्ञानेश्वरांच्या स्वतंत्र प्रतिभेचे दर्शन घडवणारे आहे. कर्म केलेच पाहिजेत हा त्यांचा श्लोकाहून भिन्न असा आग्रह आहे. जीव हा कर्म केल्याविना राहत नाही. कर्म हा जीवाचा स्वाभाविक गुणधर्म आहे. आपण जरी ठरविले की मला कर्म करायचे नाही तरी इंद्रिये ही कर्म करणारच. कान ऐकणार, डोळे पाहणार, प्राणापान वाहणार, मती निर्विकल्प होणार नाही, तहान भूक थांबणार नाही, स्वप्न थांबणार नाहीत, पाय चालण्याचे विसरणार नाहीत, जन्ममृत्यू संपणार नाहीत, मग

**हें न ठकेचि जरी कांहीं | तरी सांडिलें तें कायी**

**म्हणौनि कर्मत्यागु नाहीं | प्रकृतिमंता ||५८||**[१०]

संत ज्ञानेश्वर म्हणतात आपण प्रकृतिच्या अधीन आहोत त्यामुळे आपणास कर्मत्याग करणे शक्य नाही. आपल्याकडून कर्म तर होणारच आहे, मग चुकीचे कर्म करण्यापेक्षा आपल्या वाट्याला आलेले विहित कर्म आपण केलेच पाहिजे. हीच शिकवण संत ज्ञानेश्वर आपणास देतात. कर्म करत असताना आपण हाती घेतलेले काम सिद्धीस गेले तर आनंदी होऊ नये आणि अपूर्ण राहिले तर दुःखी होऊ नये. असे सूचित करतात.

**आचरतां सिद्धी गेलें | तरी काजाचि कीर आले**

**परी ठेलयाही सगुण सगुण जाहलें | ऐसेंची मानीं ||२७०||**[११]

अखंड कर्मरत राहावे हा उपनिषदातील सिद्धांत आहे, तोच ज्ञानेश्वरांनी पटवून दिला आहे. ईशावास्य उपनिषदातील हा कर्माचे महत्व प्रतिपादन करणार सिद्धांत आहे.

**कुर्वन्नेवेह कर्मणि जिजीविषेच्छतंसमा: |**

**एवं त्वयि नान्यथेतो$स्ति न कर्म लिप्यते नरे ||२||**[१२]

इहलोकामध्ये कर्‌म करत करत शंभर वर्षांपर्यंत जगण्याची इच्छा धरावी. आपण कर्माचा त्याग करून जगू शकत नाही. हजारो वर्षांपासून आपले उपनिषदे सुद्धा आपणास हाच उपदेश करत आलेले आहेत. या व्यतिरिक्त दुसरा कोणताही मार्ग नाही. असे जगल्यामुळे कर्म हे बंधकारक ठरणार नाही.

**४] मानसिक साम्यावस्था :**

सगळे सुखं उपभोगूनही मानवी मनामध्ये एक अपूर्णता शिल्लक राहते. काहीतरी मिळवायचे राहिले आहे, असे त्याला सतत वाटत असते. ही अपूर्णता जे काही मिळाले आहे, त्याला शून्य करते. मिळालेल्या गोष्टींचा तिळभरही आनंद शिल्लक ठेवत नाही. लौकिक जीवन जगत असताना, जे काही त्याला अनुभव येतात, जे ज्ञान प्राप्त होते, त्याने मनाची भूक भागत नाही. या संपूर्ण जगाचे यथायोग्य ज्ञान होऊनही ह्याच्या पलीकडे काहीतरी आहे, असे नेहमी वाटत असते. त्याचा साक्षात्कार व्हावा, त्याचे ज्ञान प्राप्त व्हावे, ही मानवी मनाची सुप्त इच्छा असते. ती अनादी काळापासून आहे. ही मानवी मनाची आदिम जिज्ञासा सरदार गं. बा. यांनी 'ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' या आपल्या व्याख्यानमालेत मांडले आहे. **"असतो मा सद्‌गमय, तमसो मा ज्योतिर्गमय, मृत्योर्मामृतंगमय ही उपनिषत्कालातील एका ऋषीचीच नव्हे, तर आर्त व चिंतनशील मानवाची सार्वकालिक प्रार्थना आहे. वास्तवाचे पाश झुगारून आदर्शाकडे झेप घेणाऱ्या या मानवी मनोधर्मातच अध्यात्मनिष्ठ साक्षात्कारवादाचा उगम आहे".**[१३] ही जिज्ञासा मनुष्यास अध्यात्माकडे प्रवृत्त करणारी ठरते. या साक्षात्काराला प्राप्त होणे हे मानवी मनाचे अंतिम ध्येय आहे. या अवस्थेला प्राप्त झालेल्या पुरुषाला सुखदु:ख काहीच शिल्लक राहत नाही.

**हें तूतें बहुतीं प्रसंगीं | आम्ही म्हणों याचिलागीं**
**जे साम्यापरौती जगीं | प्राप्ति नाहीं ||४१०||**[१४]

**समारोप :**

संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतील समाज जीवनाचा अंगीकार जर आपण केला तर समाजजीवनात समता प्रस्थापित होईल, विश्वबंधुता निर्माण होईल. आणि समाज जीवन हे नेहमी उन्नत होत राहील. ज्ञानेश्वरीमध्ये नीतीमूल्यांचा मोठा ठेवाच आहे. त्या ठेव्याप्रत आपण गेलं पाहिजे. त्यामुळे जीवनात आपणास नक्कीच योग्य मार्ग दिसेल व आपले जीवन सुखमय होईल.

**निष्कर्ष :**

१) ज्ञानेश्वरीतील नीतीमूल्ये जाणून घेत असताना संत ज्ञानेश्वरांची लोककल्याणाची दृष्टी दिसून येते.

२) संत ज्ञानेश्वरांनी गीतेतील अनेक श्लोकांचा अर्थ सामाजहित डोळ्यासमोर ठेऊन केलेला आहे.

३) संत ज्ञानेश्वर हे गीतार्थाला सामाजिक दृष्टिकोनातून मांडतात.

४) संत ज्ञानेश्वरांनी सांगितलेली नीतीमूल्ये ही वर्तमानकालीही उपयुक्त आहेत.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) 'ज्ञानेश्वरी', कुंटे प्रत, श्रीवामनराज प्रकाशन, तृतीय आवृत्ती २०१२,
अध्याय १४, ओवी क्र. २५, २६

२) तंत्रैव, अध्याय ३, ओवी क्र. २०४

३) तंत्रैव, अध्याय १६, ओवी क्र. २४०

४) कुलकर्णी श्री. मा.'ज्ञानेश्वरीतील शिकवण', उन्मेष प्रकाशन, नागपूर. प्र.आ.नोव्हेंबर १९५९,पृ.क्र. १८७

५) उनि. अध्याय १८, ओवी क्र. १७९५

६) बोबडे पु. वि. 'जीवन पथ दीपिका अर्थात ज्ञानेश्वरी', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. जानेवारी १९८९, पृ. क्र. २६

७) श्रीमत्भगवत्गीता, गीताप्रेस, गोरखपूर, सं. २०७५ दो सौ बारहवां पुनर्मुद्रण, अध्याय १८, श्लोक ५३

८) उनि, अध्याय २, श्लोक ४७

९) कुलकर्णी श्री. मा. उनि, पृ. क्र. ८५

१०) उनि, अध्याय ३, ओवी ५८

११) तत्रैव, अध्याय २, ओवी २७०

१२) ईशादि नौ उपनिषद् शांकरभाष्यार्थ, गीताप्रेस, गोरखपूर, सं.२०६३ तृतीय पुनर्मुद्रण, श्लोक २,पृ.क्र.६

१३) सरदार गं. बा. 'ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा', कौशिक व्याख्यानमाला, पुणे, प्र. आ. १९७१, पृ. क्र. १९

१४) उनि, अध्याय ६, ओवी ४१०